# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०७/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक**

**वाहनासह एकुण १५,२५,००० रू. /— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दि. १२/०७/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पो.स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक रेतीने भरलेला टिप्पर हा निलज कडुन भिवापूर उमरेडच्या दिशेने येत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनीय खबर वरून स्टाफचे मदतीने तहसिल कार्यालय भिवापुर येथे नाकाबंदी करून १० चक्का टिप्पर क्रं. एम एच— ३३/टी २३३३ चा चालक **आरोपी नामे—१) रितीक रवीद्र अहीरकर वय २० रा निलज ता पवनी जि भंडारा** यास थांबवुन स्टाफने पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १० चक्का टिप्पर क्रं. एम एच— ३३/टी २३३३ किंमती १५,००,०००/—रू. मध्ये ०५ ब्रास रेती किंमती २५,०००/—रू. असा एकूण १५,२५,०००/— रू चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे—१) रितीक रवीद्र अहीरकर वय २० रा निलज ता पवनी जि भंडारा २) मालक नामे सचिन मांडवकर रा खरबी चौक नागपुर** यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भारतीय न्याय संहीता २०२३ सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४, २१ खानी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी चालक यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, सफौ तुलाराम खडसे, पोशि कमलेश कोहळे यांनी पार पाडली.

## पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १२/०७/२०२४ रोजी पोस्टे बोरी येथील स्टाफ पोस्टे बोरी परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम हा बोरखेडी रेल्वे गावाच्या गेटजवळ बसून अवैधरीत्या सट्टापट्टीवर लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशा माहिती वरून बुट्टीबोरी येथील बोरखेडी रेल्वे गावाच्या गेटजवळ सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— संजय वसंतराव नंदनवार वय ५२ वर्ष रा. प्लॉट क्र. ७१ खारबी रिंग रोड गजानन हायस्कुल जवळ चौतनेश्वर नगर खरबी नागपूर ह. मु. बोरखेडी** हा सट्टापट्टीचे आकडे लिहताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता निळया शाईचा रंगाचा पेन किंमती अदाजे ५/—रू. व पांढ—या रंगाचा कागदावर आकडे लिहलेले व त्याचा कडून लोकांकडून घेतलेले नगदी १९७०/—रू. असे एकून १९७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे बोरी कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार ह्वदयनारायण यादव, पोहवा प्रविण देव्हारे, अरूण कावळे, पोशि गौरव मोकळे यांनी पार पाडली.

## नागपूर ग्रामीण हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक १२/०७/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे सावनेर परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना **आरोपी नामे— अरविंद प्रलाद अलोने वय ४६ रा. टाकळी भांसाळी** हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन सट्टापट्टीचे वेगवेगळे जुगार आकडे व पैसे घेवुन ते जुगाराचे आकडे कागदावर लिहुन देवुन वरली मटक्याचा जुगार खेळविताना मिळुन आल्याने त्याचेकडुन नगदी ८८०/— रु व सट्टापट्टीचे वेगवेगळे आकडे लिहलेले कागद किंमती ०५/—रू. एक निळया शाहीचा पेन ०५ असा एकुण ८९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ म.जु. का. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

दिनांक १२/०७/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे अरोली परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना **आरोपी नामे— भिमराज गंगाराम वाघ वय ४३ वर्ष रा निमखेडा ता मौदा जि. नागपुर** हा मौजा निमखेडा येथे आठवडी बाजारात पानठेल्याचे बाजूला सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन सट्टापट्टीचे वेगवेगळे जुगार आकडे व पैसे घेवुन ते जुगाराचे आकडे कागदावर लिहुन देवुन वरली मटक्याचा जुगार खेळविताना मिळुन आल्याने त्याचेकडुन सट्टापट्टी साहीत्य व नगदी ६७०/—रू. व एक निळया शाईचा पेन कि. ०५/रू असा एकुण ६७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ मजुका. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**